# प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.०

## वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०, पुणे, महाराष्ट्र राज्य

---

## वॉटरशेड महोत्सवानिमित्त पाणलोट विकासावर सोशल मीडिया स्पर्धा

## स्पर्धा सर्वांसाठी खुली - विजेत्यांना रोख बक्षिसांनी गौरवणार

पाणलोट विकास कामांमध्ये लोकसहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी ग्रामीण विकास मंत्रालयांतर्गत भू-संसाधन विभाग, भारत सरकार तसेच मृद व जलसंधारण विभागाकडील वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.० अंतर्गत "वॉटरशेड महोत्सवाचे " आयोजन करण्यात आले आहे.

पाणलोटाबाबत जनजागृती वाढविण्यासाठी आणि लोकसहभागातून पाणलोट विकास कामांना प्रोत्साहन देण्यासाठी दि.१२ नोव्हेंबर २०२५ ते दि. १६ डिसेंबर २०२५ या कालावधीत "सोशल मीडिया स्पर्धा" आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे.

स्पर्धकांना पाणलोट विकास घटक : प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (WDC-PMKSY) तसेच इतर केंद्र किंवा राज्य शासनाच्या पाणलोट विकास योजनांतर्गत जलसंधारणाची कामे/उपाययोजना, फलोत्पादन / कृषि वनस्पती लागवड/ कृषी वनीकरण उपक्रम या विषयांवरील रील्स आणि छायाचित्रांच्या माध्यमातून स्पर्धेत सहभागी होता येईल.

### रीलचे विषय : एकूण ५ रील बक्षिसास प्राप्त ठरणार

१. WDC-PMKSY १.० व २.० अंतर्गत तयार केलेल्या जलसंधारण संरचनांवर आधारित - २ रील
२. इतर केंद्र / राज्य पातळीवरील पाणलोट विकास योजनेअंतर्गत तयार केलेल्या जलसंधारण संरचनांवर आधारित - २ रील
३. WDC-PMKSY १.० व २.० अंतर्गत कृषिवन / उद्यान लागवडीवर आधारित - १ रील

### छायाचित्रांचे विषय : एकूण १०० छायाचित्रे बक्षिसास प्राप्त ठरणार

१. WDC-PMKSY १.० व २.० अंतर्गत झालेली जलसंधारणाची कामे तसेच कृषिवन / उद्यान लागवडींवर आधारित : ७५ छायाचित्रे

२. इतर केंद्र / राज्य पातळीवरील पाणलोट विकास योजनेअंतर्गत तयार केलेल्या जलसंधारण संरचनांवर आधारित : २५ छायाचित्रे

## पारितोषिकाचे स्वरुप :

| अ.क्र. | श्रेणी | पारितोषिकाची रक्कम |
|---|---|---|
| १ | रील (Reel) - एकूण ५ रील्स | प्रत्येकी रु. ५०,००० |
| २ | छायाचित्र (Photograph) - एकूण १०० छायाचित्रे | प्रत्येकी रु. १,००० |

## स्पर्धेत सहभागी होण्यासाठी महत्वाच्या सूचना :

१. कोणीही इच्छुक व्यक्ती वर नमूद केलेल्या विषयांवर ३० ते ६० सेकंदांचा लघु व्हिडिओ / रील्स किंवा छायाचित्रे तयार करू शकते. यामध्ये जलसंधारण संरचना /कामे (जसे की चेक डॅम, सिमेंट नाला बांध, स्टॉप डॅम, शेत/सामुदायिक/गाव तलाव, गॅबियन स्ट्रक्चर, गली प्लग, माती नाला बांध, अनघड दगडांची रचना, ट्रेंचेस इ.) तसेच WDC§PMKSY १.० आणि २.० अंतर्गत हाती घेतलेली उद्यानविद्या / कृषि वनस्पती लागवड किंवा इतर कोणत्याही केंद्र / राज्य शासनाच्या पाणलोट विकास योजनेअंतर्गत तयार झालेल्या जलसंधारण संरचना/ कामांचे व्हीडीओ चित्रिकरण आणि त्यांची उपयुक्तता याबद्दल माहिती असावी.

२. स्पर्धकांनी तयार केलेले व्हिडिओ / छायाचित्रे सोशल मीडियावर पोस्ट केल्यानंतर १२ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत https://wdcpmksy.dolr.gov.in/registerMahotsav या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन स्वरूपात नोंदणी करावी. तसेच पोस्ट केलेल्या कंटेंटचा दुवा (link) नोंदणी फॉर्ममध्ये नमूद करावा.

३. सोशल मीडियावरपोस्ट करताना “#WatershedMahotsavindia” आणि “#WatershedMahotsavMAHARASHTRA” हे दोन हॅशटॅग वापरणे बंधनकारक आहे.

४. यशस्वी नोंदणी झाल्यानंतर सहभागीला पुष्टीकरण (confirmation) ईमेल प्राप्त होईल.

५. स्पर्धेचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर ३१ जानेवारी २०२६ रोजी सायं. ६.०० वाजेपर्यंत, सहभागीने आपल्या पोस्टची पोहोच (views) व सहभाग (comments आणि likes) यांचे स्क्रीनशॉट सादर करणे आवश्यक आहे.

६. IWMP / WDC-PMKSY १ आणि WDC-PMKSY २ अंतर्गत विकसित केलेल्या जलसंधारण संरचनां/ कामांविषयी सविस्तर माहिती https://wdcpmksy.dolr.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच सोबत जोडली आहे.

७. स्पर्धकांनी अधिकृत हॅशटॅग वापरणे आणि अधिकृत सोशल मीडिया हँडल टॅग करणे आवश्यक आहे.

## सोशल  मीडिया स्पर्धेतील स्पर्धकांची निवड प्रक्रिया :

सोशल  मीडिया स्पर्धेतील विजेते खालील निकषांच्या आधारे निवडले जातील :

| अनु. क्र. | निकष | गुणांचे प्रमाण | वर्णन |
|---|---|---|---|
| १ | पोहोच (Views) | ४५% | मिळालेल्या दृश्यांची (Views)संख्या |
| २ | सहभाग (Engagement) | २५% | मिळालेली likes, shares आणि comments ची संख्या |
| ३ | विषयाशी सुसंगता (Relevance to Theme) | १०% | WDC प्रकल्पांतर्गत केलेल्या पाणलोट विकास कामांचा विषय परावर्तित करणारे |
| ४ | सर्जनशीलता व मौलिकता (Creativity & Originality) | १०% | नाविन्यपूर्ण कल्पना, वेगळा दृष्टिकोन आणि सादरीकरणातील आकर्षकता |
| ५ | दृश्य व तांत्रिक गुणवत्ता (Visual & Technical Quality) | १०% | चांगली रचना, स्पष्टता, प्रकाशयोजना; रीलससाठी स्थिर दृश्य व स्पष्ट ध्वनी |

## इतर अटी व शर्ती :

१. कोणत्याही कायदा, नियम, अधिनियम, मार्गदर्शक सूचना इत्यादींचे उल्लंघन झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित सहभागीची राहील.
२. विजेते म्हणून निवडलेली रील्स / छायाचित्रे निर्धारित पोर्टलवर सादर केल्यानंतर त्यांचे कॉपीराइट हक्क भू-संपदा विभाग (DoLR) यांच्याकडे राहतील. ही सामग्री DoLR किंवा संबंधित राज्य विभागांकडून प्रसिद्धी, प्रशिक्षण किंवा शैक्षणिक हेतूसाठी वापरली जाऊ शकते.
३. एका व्यक्तीस जास्तीत जास्त एक (०१) रीलससाठी व एक (०१) छायाचित्रासाठी पारितोषिक मिळू शकते.
४. अश्लील किंवा आक्षेपार्ह सामग्री स्पर्धेसाठी ग्राह्य धरली जाणार नाही.
५. सादर केलेल्या रील्स / छायाचित्रांमध्ये दाखवलेले ठिकाण आणि लाभार्थी वास्तविक असणे आवश्यक आहे. चुकीची ठिकाणे किंवा खोटे लाभार्थी दाखविलेल्या नोंदी अपात्र ठरतील.
६. एका व्यक्तीला रील्स आणि छायाचित्र या दोन्ही श्रेणींमध्ये एकापेक्षा अधिक नोंदी सादर करता येतील.

७. रील्सवरील फक्त स्वाभाविकरीत्या (organic) प्राप्त झालेले views आणि engagement ग्राह्य धरले जातील. कृत्रिमरीत्या वाढविलेल्या (boosted) रील्स कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरवल्या जातील.
८. WDC§PMKSY योजनेच्या अंमलबजावणीशी संबंधित शासकीय अधिकारी या स्पर्धेसाठी पात्र राहणार नाहीत.

## प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० - वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.० ची सोशल मीडिया हॅण्डल्स :

| Sr. No. | Social Media Platforms | Social Media Handles |
|---|---|---|
| १ | Facebook | Vasundhara Pmksy Maharashtra |
| २ | X | @VasundharaPmksy |
| ३ | Twitter | @VasundharaPmksy |
| ४ | Linkedin | @vslna-pune |
| ५ | YouTube : | @VasundharaPmksyMaharashtra |

xxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxxx